भारत सरकार
विधी, न्याय व कंपनी कार्य मंत्रालय

सत्यमेव जयते

# प्रसूतिविषयक लाभ अधिनियम, १९६१

(सन १९६१ चा अधिनियम क्रमांक ५३)

[ दिनांक १५ फेब्रुवारी १९९४ रोजी यथाविद्यमान ]

# The Maternity Benefit Act, 1961

(Act No. 53 of 1961)

[ As in force on the 15th February 1994 ]

संचालक, मुद्रण व लेखनसामग्री, महाराष्ट्र शासन यांनी
भारत सरकारच्या वतीने मुद्रित व प्रकाशित केले.
१९९४.
[ किंमत : रु. ३.०० पैसे ]

## प्राक्कथन

या आवृत्तीत, दिनांक १५ फेब्रुवारी १९९४ रोजी यथाविद्यमान असलेला मॅटर्निटी **बेनिफीट अॅक्ट,** १९६१ याचा मराठीतील प्राधिकृत पाठ दिलेला आहे. हा पाठ **भारताचे राजपत्र,** असाधारण, भाग बारा, अनुभाग-१, खंड ५, अंक १, दिनांक २३ जून १९९४ यात पृष्ठ ३ ते ११ मध्ये प्रकाशित करण्यात आला होता. हा प्राधिकृत मराठी पाठ, प्राधिकृत पाठ (केंद्रीय विधि) अधिनियम, १९७३ याच्या कलम २, खंड (क) अन्वये राष्ट्रपतींच्या प्राधिकाराने प्रकाशित करण्यात आला होता आणि अशा रीतीने प्रकाशित करण्यात आल्यानंतर हा पाठ, उक्त अधिनियमाचा प्राधिकृत मराठी पाठ म्हणून समजण्यात आला आहे.

**के. एल. मोहनपुरिया,**
सचिव,
भारत सरकार.

नवी दिल्ली,
दिनांक २३ जून १९९४.

---

## PREFACE

This edition of the Maternity Benefit Act, 1961 as on the 15th February 1994 contains the authoritative text of that Act in Marathi which was published in the *Gazette of India,* Extraordinary, Part XII, section 1, No. 1, Vol. 5, dated 23rd June 1994 on pages 3 to 11.

This authoritative text was published under the authority of the President under section 2 clause (*a*) of the Authoritative Texts (Central Laws) Act, 1973 and on such publication it became the authoritative text of that Act in Marathi.

K. L. MOHANPURIYA,
Secretary to the
Government of India.

New Delhi,
dated 23rd June 1994.

## विशोधन अधिनियमांची सूची

१. ‘केंद्रीय कामगार कायदे (जम्मू व काश्मीरवर विस्तारण) अधिनियम, १९७०’ (१९७० चा ५१).

२. ‘प्रसूतिविषयक लाभ (विशोधन) अधिनियम, १९७२’ (१९७२ चा २१).

३. ‘प्रसूतिविषयक लाभ (विशोधन) अधिनियम, १९७३’ (१९७३ चा ५२).

४. ‘प्रसूतिविषयक लाभ (विशोधन) अधिनियम, १९७६’ (१९७६ चा ५३).

५. ‘प्रसूतिविषयक लाभ (विशोधन) अधिनियम, १९८८’ (१९८८ चा ६१).

# प्रसूतिविषयक लाभ अधिनियम, १९६१

## कलमांचा क्रम

कलमे

१. संक्षिप्त नाव, विस्तार व प्रारंभ.
२. अधिनियमाची प्रयुक्ती.
३. व्याख्या.
४. विशिष्ट कालावधीमध्ये स्त्रियांना कामावर ठेवण्यास किंवा त्यांना काम करण्यास मनाई.
५. प्रसूतिविषयक लाभाची रक्कम मिळण्याचा अधिकार.
५क. विवक्षित प्रकरणी प्रसूतिविषयक लाभाची रक्कम देण्याचे चालू ठेवणे.
५ख. विवक्षित प्रकरणी प्रसूतिविषयक लाभाची रक्कम देणे.
६. प्रसूतिविषयक लाभाच्या रकमेबाबत मागणी-नोटीस आणि त्या रकमेचे प्रदान.
७. स्त्रीचा मृत्यू झाल्यास प्रसूतिविषयक लाभाची रक्कम देणे.
८. वैद्यकीय बोनस देणे.
९. गर्भपाताबद्दल रजा.
१०. गरोदरपणा, प्रसूती, अकालप्रसूती किंवा गर्भपात यातून उद्‌भवणाऱ्या आजारपणाबद्दल रजा.
११. मुलांना पाजण्यासाठी कामाच्या वेळातील सुट्या.
१२. गरोदरपणानिमित्त अनुपस्थित असण्याच्या काळात कामावरून काढून टाकणे.
१३. विवक्षित प्रकरणी वेतनात कोणतीही कपात करावयाची नाही.
१४. निरीक्षकांची नियुक्ती.
१५. निरीक्षकांच्या शक्ती व कर्तव्ये.
१६. निरीक्षक हे लोकसेवक असणे.
१७. रकमा देण्याबाबत निदेश देण्याची निरीक्षकाची शक्ती.
१८. प्रसूतिविषयक लाभ गमावणे.
१९. अधिनियम आणि त्याखाली केलेले नियम यांचा गोषवारा प्रदर्शित करणे.
२०. नोंदवह्या, इत्यादी.
२१. नियोक्त्याने अधिनियमाचे व्यतिक्रमण केल्याबद्दल शास्ती.
२२. निरीक्षकाला अटकाव करण्याबद्दल शास्ती.
२३. अपराधांची दखल.
२४. सद्‌भावपूर्वक केलेल्या कारवाईस संरक्षण.
२५. निदेश देण्याची केंद्र शासनाची शक्ती.
२६. आस्थापनांना सूट देण्याची शक्ती.
२७. या अधिनियमाशी विसंगत असे कायदे व करार यांची परिणामकता.
२८. नियम करण्याची शक्ती.
२९. १९५१ चा अधिनियम ६९ याचे विशोधन.
३०. निरसन.

शब्दसूची—
इंग्रजी—मराठी
मराठी—इंग्रजी

# प्रसूतिविषयक लाभ अधिनियम, १९६१

## (१९६१ चा अधिनियम क्रमांक ५३)

(दिनांक १५ फेब्रुवारी १९९४ रोजी यथाविद्यमान) [१२ डिसेंबर, १९६१]

स्त्रियांना प्रसूतिपूर्वी किंवा त्यानंतर विवक्षित कालावधीमध्ये विवक्षित आस्थापनांमध्ये कामावर ठेवण्याबाबत विनियमन करण्यासाठी आणि प्रसूतिविषयक लाभ व अन्य विवक्षित लाभ यांबाबत उपबंध करण्यासाठी अधिनियम.

भारतीय गणराज्याच्या बाराव्या वर्षी संसदेकडून पुढीलप्रमाणे अधिनियमित होवो :—

१. (१) या अधिनियमास 'प्रसूतिविषयक लाभ अधिनियम, १९६१' असे म्हणता येईल.

(२) त्याचा विस्तार [१]* * * * संपूर्ण भारतभर आहे. संक्षिप्त नाव, विस्तार व प्रारंभ.

(३) [२][(क). खाणीच्या आणि जेथे घोडेस्वारी, नाडेभोरप्याचा खेळ व अन्य खेळ करून दाखविण्यासाठी व्यक्ती नेमलेल्या आहेत. अशा अन्य कोणत्याही आस्थापनेच्या संबंधात केंद्र शासनाकडून ; आणि]

(ख) राज्यामधील अन्य आस्थापनांच्या संबंधात, राज्य शासनाकडून शासकीय राजपत्रात या बाबतीत अधिसूचित करण्यात येईल अशा [३]दिनांकास तो अंमलात येईल.

२. [४][(१) तो प्रथमत: अधिनियमाची प्रयुक्ती.

(क) कारखाना, खाण किंवा मळा या स्वरूपाच्या प्रत्येक आस्थापनेला ...... शासनाच्या मालकीच्या अशा कोणत्याही आस्थापनेतसुद्धा ...... आणि जेथे घोडेस्वारी, नाडेभोरप्याचा खेळ व अन्य खेळ करून दाखविण्यासाठी व्यक्ती नेमलेल्या आहेत. त्या प्रत्येक आस्थापनेला ;

(ख) पूर्वीच्या बारा महिन्यांच्या कोणत्याही दिवशी, राज्यातील दुकाने व आस्थापना यांमध्ये त्यांच्या संबंधात त्याकाळापुरत्या अंमलात असलेल्या कोणत्याही कायद्याच्या अर्थांतर्गत दहा किंवा अधिक व्यक्ती कामावर असतील किंवा होत्या अशा प्रत्येक दुकानाला व आस्थापनेला

लागू आहे :]

परंतु, केंद्र शासनाच्या मान्यतेने राज्य शासनाला या अधिनियमाचे सर्व किंवा त्यापैकी कोणतेही उपबंध अन्य कोणत्याही औद्योगिक, वाणिज्यिक, शेतकी किंवा अन्य प्रकारच्या आस्थापनेला किंवा आस्थापना वर्गाला लागू करण्याचा आपला उद्देश असल्याची किमान दोन महिन्यांची नोटीस देऊन नंतर शासकीय राजपत्रातील अधिसूचनेद्वारे ते तसे लागू केल्याचे घोषित करता येईल.

(२) [५][कलम ५ क आणि ५ ख] [६][मध्ये अन्यथा उपबंधित केले असेल त्याव्यतिरिक्त एरव्ही, या अधिनियमात अंतर्भूत असलेली कोणतीही गोष्ट] ज्या कारखान्याला किंवा अन्य आस्थापनेला "कामगार राज्य विमा अधिनियम, १९४८" (१९४८ चा ३४) याचे उपबंध त्या त्या काळी लागू असतील अशा कोणत्याही कारखान्याला किंवा अन्य आस्थापनेला लागू होणार नाही.

३. या अधिनियमात, संदर्भामुळे अन्यथा आवश्यक नसेल तर,— व्याख्या.

(क) "समुचित शासन" याचा खाण स्वरूपात असलेल्या आस्थापनेच्या [७][किंवा जेथे घोडेस्वारी, नाडेभोरप्याचा खेळ आणि अन्य खेळ करण्यासाठी व्यक्ती नेमलेल्या आहेत त्या आस्थापनेच्या] संबंधातील अर्थ, केंद्र शासन असा आहे आणि अन्य कोणत्याही आस्थापनेच्या संबंधातील अर्थ, राज्य शासन असा आहे ;

---

१. १९७० चा अधिनियम, ५१, कलम २ व अनुसूची याद्वारे "जम्मू व काश्मीर-राज्य खेरीज-करून हा मजकूर गाळला.

२. १९७३ चा अधिनियम ५२, कलम २ द्वारे मूळ खंड (क) ऐवजी घातले. (१ मार्च १९७५ रोजी व तेव्हापासून).

३. १ नोव्हेंबर १९६८–पहा : अधिसूचना क्र. एस.ओ. २९२० दिनांक ५ ऑक्टोबर १९६३, गॅझेट ऑफ इंडिया-भाग दोन, विभाग ३ (इंग्रजी) पृष्ठ ३७३५.

४. १९८८ चा अधिनियम ६१, कलम २ द्वारे दाखल केले. (१० जानेवारी १९८९ रोजी व तेव्हापासून).

५. १९७२ चा अधिनियम २१, कलम २ द्वारे "या अधिनियमात अंतर्भूत असलेली कोणतीही गोष्ट" याऐवजी घातले.

६. १९७६ अधिनियम ५३, कलम २ द्वारे "कलम ५क" याऐवजी घातले (१ मे १९७६ रोजी व तेव्हापासून).

७. १९७३ चा अधिनियम ५२, कलम ४ द्वारे समाविष्ट केले (१ मार्च १९७५ रोजी व तेव्हापासून).

(ख) "बालक" यामध्ये मृतजात बालकाचा समावेश आहे;

(ग) "प्रसूति" याचा अर्थ, बालकाला जन्म देणे असा आहे;

(घ) "नियोक्ता" याचा अर्थ पुढीलप्रमाणे आहे :—

(एक) शासनाच्या नियंत्रणाखाली असलेल्या आस्थापनेच्या संबंधात, कामगारांवर देखरेख व नियंत्रण करण्यासाठी शासनाने नियुक्त केलेली व्यक्ती किंवा प्राधिकरण अथवा जर अशी कोणतीही व्यक्ती किंवा प्राधिकरण नियुक्त केलेले नसेल, तर, विभागप्रमुख;

(दोन) कोणत्याही स्थानिक प्राधिकरणाच्या अखत्याराखालील आस्थापनेच्या संबंधात, कामगारांवर देखरेख व नियंत्रण ठेवण्यासाठी अशा प्राधिकरणाने नियुक्त केलेली व्यक्ती अथवा जर अशी कोणतीही व्यक्ती नियुक्त केलेली नसेल तर, त्या स्थानिक प्राधिकरणाचा प्रमुख कार्यकारी अधिकारी;

(तीन) अन्य कोणत्याही बाबतीत ज्या व्यक्तीचे किंवा प्राधिकरणाचे आस्थापनेच्या कारभारावर अंतिम नियंत्रण असेल ती व्यक्ती किंवा प्राधिकरण आणि जेव्हा उक्त कारभार अन्य कोणत्याही व्यक्तीकडे सोपवलेला असेल तेव्हा ती व्यक्ती—मग तिला व्यवस्थापक, व्यवस्थापन संचालक किंवा व्यवस्थापन एजंट म्हणून किंवा अन्य कोणत्याही नावाने संबोधले जावो;

[1][ (ङ) "आस्थापना" याचा अर्थ पुढीलप्रमाणे आहे :—

(एक) कारखाना ;

(दोन) खाण ;

(तीन) मळा ;

(चार) ज्या आस्थापनेमध्ये घोडस्वारी, नाडेभोरप्याचा खेळ आणि अन्य खेळ करून दाखविण्यासाठी व्यक्ती नेमलेल्या आहेत ती आस्थापना ; [2][ * * ]

[3][ (चार क) दुकान किंवा आस्थापना ; अथवा]

(पाच) कलम २ पोटकलम (१) खाली या अधिनियमाचे उपबंध जिला लागू असल्याचे घोषित केलेले आहे ती आस्थापना ; ]

(च) "कारखाना" याचा अर्थ, "कारखाने अधिनियम, १९४८" (१९४८ चा ६३) कलम २, खंड (ङ) यामध्ये व्याख्या केल्याप्रमाणे कारखाना असा आहे ;

(छ) "निरीक्षक" याचा अर्थ, कलम १४ खाली नियुक्त केलेला निरीक्षक असा आहे;

(ज) "प्रसूतिविषयक लाभ" याचा अर्थ, कलम ५—पोटकलम (१) मध्ये निर्देशिलेल्या रकमेचे प्रदान असा आहे;

(झ) "खाण" याचा अर्थ, "खाणी अधिनियम, १९५२" (१९५२ चा ३५) कलम २ खंड (ञ) मध्ये व्याख्या केल्याप्रमाणे खाण असा आहे;

(ञ) "गर्भपात" याचा अर्थ, गर्भधारणा झालेल्या गर्भाशयातून गरोदरपणाच्या सव्विसाव्या आठवड्यापूर्वी किंवा त्या आठवड्याच्या दरम्यान कोणत्याही कालावधीमध्ये गर्भ पडून जाणे असा आहे, पण यात, "भारतीय दंड संहिता" (१८६० चा ४५) याखाली जो गर्भपात घडवून आणणे हे शिक्षापात्र आहे अशा कोणत्याही गर्भपाताचा समावेश नाही;

(ट) "मळा" याचा अर्थ, मळे कामगार अधिनियम, १९५१ (१९५१ चा ६९) कलम २, खंड (च) मध्ये व्याख्या केल्याप्रमाणे मळा असा आहे;

(ठ) "विहित" याचा अर्थ, या अधिनियमाखाली केलेल्या नियमांद्वारे विहित केलेले असा आहे;

(ड) "राज्य शासन" याचा संघ राज्यक्षेत्राच्या संबंधातील अर्थ, त्याचा प्रशासक असा आहे;

(ढ) "वेतन" याचा अर्थ, रोजगार-संविदेच्या व्यक्त किंवा उपलक्षित अटी पूर्ण झाल्यास स्त्रीला पैशाच्या रूपाने दिले जाणारे अथवा प्रदेय होणारे सर्व पारिश्रमिक असा आहे, आणि त्यामध्ये—

(१) एखादी स्त्री त्या त्या काळी ज्यांना हक्कदार असेल असे रोख भत्ते (महागाई भत्ता व घरभाडे भत्ता धरून);

---

१. १९७३ चा अधिनियम ५२, कलम ४ द्वारे समाविष्ट केले (१ मार्च १९७५ रोजी व तेव्हापासून).

२. १९८८ चा अधिनियम ६१, कलम ३ द्वारे "किंवा" शब्द वगळण्यात आला (१० जानेवारी १९८९ रोजी व तेव्हापासून).

३. वरील अधिनियमाच्या कलम ३ द्वारे घालण्यात आले (१० जानेवारी १९८९ रोजी व तेव्हापासून)

(२) प्रोत्साहन बोनस; आणि

(३) सवलतीच्या दराने पुरवावयाची अन्नधान्ये व अन्य जिनसा यांचे रोख मूल्य, यांचा समावेश आहे, पण त्यामध्ये—

(एक) प्रोत्साहन बोनसहून अन्य कोणताही बोनस;

(दोन) अतिकालिक कामाबद्दलची कमाई व द्रव्यदंडादाखल कापली जाणारी किंवा भरावी लागणारी कोणतीही रक्कम;

(तीन) त्या त्या काळी अंमलात असलेल्या कोणत्याही कायद्याखाली त्या स्त्रीच्या लाभासाठी पेन्शननिधी किंवा भविष्यनिधी यामध्ये नियोक्त्याने केलेले किंवा त्याच्याकडून प्रदेय असलेले कोणतेही अंशदान; आणि

(चार) सेवासमाप्तीनंतर प्रदेय होणारे कोणतेही उपदान, यांचा समावेश नाही;

(ण) "स्त्री" याचा अर्थ, कोणत्याही आस्थापनेमध्ये वेतनावर कामाला लावलेली स्त्री असा आहे—मग ते प्रत्यक्षपणे असो वा कोणत्याही यंत्रणेमार्फत असो.

४. (१) कोणताही नियोक्ता कोणत्याही आस्थापनेमध्ये जाणूनबुजून कोणत्याही स्त्रीला तिची प्रसूती किंवा गर्भपात झाल्या दिवसापासून पुढील सलग सहा आठवड्यांपर्यंत कामावर ठेऊ शकणार नाही. विशिष्ट कालावधीमध्ये स्त्रियांना कामावर ठेवण्यास किंवा त्यांना काम करण्यास मनाई.

(२) कोणत्याही स्त्रीला तिची प्रसूती किंवा गर्भपात झाल्या दिवसापासून पुढील सलग सहा आठवड्यांपर्यंत कोणत्याही आस्थापनेमध्ये काम करता येणार नाही.

(३) कलम ६ च्या उपबंधांना बाध न येता, पोटकलम (४) मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या कालावधीमध्ये कोणत्याही गर्भवती स्त्रीने, जे काम काबाडकष्टाच्या स्वरूपाचे आहे अथवा ज्यामध्ये तासन्तास उभे रहावे लागते अथवा ज्यामुळे तिच्या गरोदरपणात किंवा गर्भाच्या नियमित वाढीमध्ये कोणत्याही प्रकारे अडथळा निर्माण होण्याची शक्यता आहे अथवा ज्यामुळे तिचा गर्भपात घडण्याची किंवा अन्यथा तिच्या प्रकृतीवर अनिष्ट परिणाम होण्याची शक्यता आहे, त्या कामाच्या बाबतीत विनंती केली असता तिचा नियोक्ता तिला असे कोणतेही काम करावयास लावणार नाही.

(४) पोटकलम (३) मध्ये निर्देशित केलेला कालावधी पुढीलप्रमाणे असेल :—

(क) प्रसूतीच्या अपेक्षित दिनांकापूर्वीच्या सहा आठवड्यांच्या कालावधीच्या लगतपूर्वीचा एक महिन्याचा कालावधी;

(ख) त्या उक्त सहा आठवड्यांच्या कालावधीमधील ज्या कालावधीमध्ये गर्भवती स्त्री कलम ६ खाली अनुपस्थिती रजेचा फायदा घेत नाही असा कोणताही कालावधी.

५. [1][(१) या अधिनियमाच्या उपबंधांच्या अधीनतेने, प्रत्येक स्त्री तिच्या प्रसूतीच्या दिनांक धरून प्रसूतीच्या लगतपूर्वीचा तिच्या प्रत्यक्ष अनुपस्थितीचा कालावधी आणि त्या दिवसानंतरच्या लागोपाठचा कोणताही कालावधी याबद्दल सरासरी दैनिक वेतनाच्या दराने प्रसूतिविषयक लाभाची रक्कम मिळण्यास हक्कदार असेल आणि ती देण्यास तिचा नियोक्ता दायी असेल.] प्रसूतिविषयक लाभाची रक्कम मिळण्याचा अधिकार.

**स्पष्टीकरण.**—या पोटकलमाच्या प्रयोजनार्थ, "सरासरी दैनिक वेतन" याचा अर्थ, प्रसूतीनिमित्त ज्या दिनांकापासून ती स्त्री अनुपस्थित राहील त्याच्या लगतपूर्वीच्या तीन कॅलेंडर महिन्यांच्या कालावधीमध्ये जितके दिवस तिने काम केलेले असेल त्या दिवसांबद्दल तिला प्रदेय असणाऱ्या वेतनाची सरासरी [1][वेतनाचा किमान दर किमान वेतन अधिनियम, १९४८ (१९४८ चा ११) अन्वये निश्चित किंवा सुधारित करण्यात आला असेल तो किंवा दहा रुपये यांपैकी जे जास्त असेल ते वेतन असा आहे.]

(२) कोणतीही स्त्री, ज्या नियोक्त्याकडे ती प्रसूतिविषयक लाभाची मागणी करील त्याच्या आस्थापनेमध्ये तिने तिच्या प्रसूतीच्या अपेक्षित दिनांकाच्या लगतपूर्वी बारा महिन्यांमध्ये किमान [2][ऐंशी दिवस] इतका काळ काम केले असल्याशिवाय प्रसूतिविषयक लाभाला हक्कदार होणार नाही :

परंतु, उक्त [2][ऐंशी दिवसांचा] अर्हकारी कालावधी, जी स्त्री स्थलांतर करून आसाम राज्यामध्ये आलेली असेल व स्थलांतराच्या वेळी गर्भवती असेल त्या स्त्रीला लागू होणार नाही.

**स्पष्टीकरण.**—आस्थापनेमध्ये स्त्रीने जितके दिवस प्रत्यक्षात काम केलेले आहे त्या दिवसांची या पोटकलमाखाली परिगणना करण्याच्या प्रयोजनार्थ, तिच्या प्रसूतीच्या अपेक्षित दिनांकाच्या लगतपूर्वीच्या बारा महिन्यांच्या कालावधीमध्ये [1][जितक्या दिवसांसाठी तिला अपरिहार्य कामबंदी लागू करण्यात आली असेल अथवा त्या काळापुरत्या अंमलात असलेल्या कोणत्याही कायद्यान्वये वेतनी सुटी म्हणून घोषित केलेल्या सुटीवर असेल ते दिवस हिशेबात घेतले जातील.]

---

१. १९८८ चा अधिनियम ६१, कलम ४ द्वारे मूळ मजकुराऐवजी घातले (१० जानेवारी १९८९ रोजी व तेव्हापासून).

२. वरील अधिनियमाच्या कलम ४ द्वारे "एकशेसाठ दिवस" या शब्दोल्लेखाऐवजी घातले (१० जानेवारी १९८९ रोजी व तेव्हापासून).

[1][(३) जितक्या कमाल कालावधीबाबत कोणतीही स्त्री प्रसूतिविषयक लाभास हक्कदार असेल कालावधी बारा आठवडे असेल ज्यापैकी तिच्या अपेक्षित प्रसूति दिनांकापूर्वीचा कालावधी सहा आठवड्यापेक्षा अधिक असणार नाही:]

परंतु, जर या कालावधीमध्ये एखादी स्त्री मृत्यू पावली तर, तिच्या मृत्यूच्या दिवसापर्यंत व तो दिवस धरून जितके दिवस होतील तेवढ्या दिवसांपुरताच तिला प्रसूतिविषयक लाभ प्रदेय असेल :

[1][परंतु आणखी असे की, एखादी स्त्री मुलाला जन्म दिल्यानंतर प्रसूतिकाळातच किंवा ज्यासाठी ती प्रसूतिविषयक लाभास हक्कदार असेल अशा प्रसूतीच्या दिनांकाच्या लगतनंतरच्या कालावधीमध्ये मृत्यू पावली व दोन्ही बाबतीत तिच्या त्यामागे मूल जिवंत राहिले तर, नियोक्ता त्या संपूर्ण कालावधीबाबत, पण जर उक्त कालावधीमध्ये मूलही मृत्यू पावले तर मग मुलाच्या मृत्यूचा दिवस धरून त्या दिवसापर्यंतच्या दिवसांपुरताच प्रसुतिविषयक लाभ देण्यास दायी असेल.]

[2][विवक्षित प्रकरणी प्रसूतिविषयक लाभाची रक्कम देण्याचे चालू ठेवणे.]

[2][५क. या अधिनियमाखाली प्रसूतिविषयक लाभ मिळण्यास हक्कदार असलेली प्रत्येक स्त्री, ती ज्या कारखान्यात किंवा अन्य आस्थापनेमध्ये कामाला असेल त्यांना "कामगार राज्य विमा अधिनियम, १९४८" (१९४८ चा ३४) लागू होत असला तरीही, ती त्या अधिनियमाच्या कलम ५० खाली प्रसूतिविषयक लाभ मागण्यास अर्ह होईपर्यंत तशी हक्कदार असण्याचे चालू राहील.]

[3][विवक्षित प्रकरणी प्रसूतिविषयक लाभाची रक्कम देणे.]

[3][५ख. (क) जी स्त्री "कामगार राज्य विमा अधिनियम, १९४८" (१९४८ चा ३४) याचे उपबंध ज्या कारखान्याला किंवा अन्य आस्थापनेला लागू होतात तेथे कामाला असेल ;

(ख) जिचे एखाद्या महिन्याचे वेतन (अतिकालिक कामाबद्दलचे पारिश्रमिक वगळून त्या अधिनियमाच्या कलम २, खंड (९), उपखंड (ख) मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या रकमेहून अधिक असेल; आणि

(ग) जी कलम ५, पोटकलम (२) मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या शर्ती पुऱ्या करते, अशी प्रत्येक स्त्री या अधिनियमाखाली प्रसूतिविषयक लाभ मिळण्यास हक्कदार असेल.]

**प्रसूतिविषयक लाभाच्या रकमेबाबत मागणी नोटीस आणि त्या रकमेचे प्रदान.**

६. (१) आस्थापनेमध्ये कामाला असणारी व या अधिनियमाच्या उपबंधाखाली प्रसूतिविषयक लाभाला हक्कदार असणारी कोणतीही स्त्री, आपल्या नियोक्त्याला विहित असेल अशा नमुन्यात लेखी नोटीस देऊन तीद्वारे असे निवेदन करू शकेल की, ती या अधिनियमाखाली जो प्रसूतिविषयक लाभ व अन्य कोणतीही रक्कम यांना हक्कदार आहे ते तिला किंवा ती नोटीशीमध्ये नामनिर्देशित करील अशा व्यक्तीला दिले जावे आणि जितक्या कालावधीबाबत तिला प्रसूतिविषयक लाभ मिळेल त्या कालावधीमध्ये ती कोणत्याही आस्थापनेमध्ये काम करणार नाही.

(२) जी स्त्री गर्भवती असेल तिच्या बाबतीत, ती जेव्हापासून कामावर अनुपस्थित राहणार असेल तो दिनांक अशा नोटिशीत नमूद करावा लागेल व असा दिनांक तिच्या प्रसूतीच्या अपेक्षित दिनांकापासून सहा आठवड्यांपेक्षा अगोदरचा नसावा.

(३) ज्या स्त्रीने ती गर्भवती असताना नोटीस दिलेली नसेल अशी कोणतीही स्त्री तिच्या प्रसूतीनंतर शक्य तितक्या लवकर अशी नोटीस देऊ शकेल.

[4][(४) नोटीस मिळाल्यावर, नियोक्ता अशा स्त्रीच्या प्रसूतीच्या दिवसानंतर तिला प्रसूतिविषयक लाभ मिळत असतील त्या कालावधीत तिला आस्थापनेमध्ये अनुपस्थित राहण्यास परवानगी देईल.]

(५) त्या स्त्रीच्या प्रसूतीच्या अपेक्षित दिनांकाच्या लगतपूर्वीच्या कालावधीबाबतची प्रसूतीविषयक लाभाची रक्कम, ती स्त्री गर्भवती आहे याबाबतचा विहित करण्यात येईल असा पुरावा सादर करण्यात आल्यावर नियोक्त्याकडून आगाऊ दिली जाईल, आणि नंतरच्या कालावधीबाबत देय असलेली रक्कम त्या स्त्रीने मुलाला जन्म दिला याबाबतचा विहित करण्यात येईल असा पुरावा सादर करण्यात आल्यावर अठ्ठेचाळीस तासांच्या आत नियोक्त्याकडून त्या स्त्रीला दिली जाईल.

(६) या कलमाखाली नोटीस दिली नाही म्हणून एखादी स्त्री, जर ती अन्यथा या अधिनियमाखाली प्रसूतिविषयक लाभाला किंवा अन्य कोणत्याही रकमेस हक्कदार असेल तर असा लाभ किंवा रक्कम मिळण्याच्या हक्कापासून वंचित होणार नाही आणि अशा कोणत्याही बाबतीत निरीक्षक स्वत: होऊन किंवा त्या स्त्रीने त्याच्याकडे अर्ज केल्यावर, आदेश काढून त्यामध्ये विनिर्दिष्ट करण्यात येईल अशा कालावधीच्या आत असा लाभ किंवा रक्कम देण्यास फर्मावू शकेल.

---

१. १९८८ चा अधिनियम ६१, कलम ४ द्वारे मूळ मजकुराऐवजी घातले (१० जानेवारी १९८९ रोजी व तेव्हापासून).

२. १९७२ चा अधिनियम २१, कलम ३ द्वारे घातले.

३. १९७६ चा अधिनियम ५३, कलम ३ द्वारे घातले (१ मे १९७६ रोजी व तेव्हापासून).

४. १९८८ चा अधिनियम ६१, कलम ५ द्वारे मूळ मजकुराऐवजी घातले (१० जानेवारी १९८९ रोजी व तेव्हापासून).

७. जर या अधिनियमाखाली प्रसूतिविषयक लाभाला किंवा अन्य कोणत्याही रकमेला हक्कदार असलेली एखादी स्त्री असा प्रसूतिविषयक लाभ किंवा रक्कम मिळण्यापूर्वीच मृत्यू पावली अथवा कलम ५, पोटकलम (३) च्या दुसऱ्या परंतुकाखाली प्रसूतिविषयक लाभ देण्यास नियोक्ता दायी असला तर, नियोक्ता असा लाभ किंवा रक्कम कलम ६ खाली देण्यात आलेल्या नोटिशीमध्ये त्या स्त्रीने नामनिर्देशित केलेल्या व्यक्तीला आणि असा कोणताही नामनिर्देशिती नसल्यास, तिच्या वैध प्रतिनिधीला देईल. स्त्रीचा मृत्यू झाल्यास प्रसूतिविषयक लाभाची रक्कम देणे.

८. या अधिनियमाखाली प्रसूतिविषयक लाभाला हक्कदार असलेली प्रत्येक स्त्री, जर प्रसूतिपूर्वी प्रसूतिगृहात दाखल करण्यासाठी व प्रसूतीनंतरची देखभाल करण्यासाठी नियोक्त्याने विनाशुल्क सोय केलेली नसेल तर, आपल्या नियोक्त्याकडून [1][दोनशे पन्नास रुपये] वैद्यकीय बोनस मिळण्यास हक्कदार असेल. वैद्यकीय बोनस देणे.

९. गर्भपाताच्या बाबतीत, विहित करण्यात येईल असा पुरावा सादर केल्यानंतर ती स्त्री तिचा गर्भपात झाल्यादिवसापासून सलग सहा आठवड्यांच्या कालावधीपर्यंत प्रसूतिविषयक लाभाच्या दराने वेतनासहित रजा मिळण्यास हक्कदार असेल. गर्भपाताबद्दल रजा.

१०. गरोदरपणा, प्रसूती, अकालप्रसूती किंवा गर्भपात यातून उद्‌भवणाऱ्या आजाराने रुग्णाईत असलेली स्त्री विहित करण्यात येईल असा पुरावा सादर केल्यावर कलम ६ किंवा, प्रकरणपरत्वे, कलम ९ खाली तिला अनुज्ञेय असलेल्या अनुपस्थितीच्या कालावधीशिवाय आणखी जास्तीत जास्त एक महिन्याच्या कालावधीपर्यंत प्रसूतिविषयक लाभाच्या दराने वेतनासहित रजा मिळण्यास हक्कदार असेल. गरोदरपणा, प्रसूती, अकाल-प्रसूती किंवा गर्भपात यांतून उद्‌भवणाऱ्या आजारपणाबद्दल रजा.

११. मुलाला जन्म दिलेली जी स्त्री अशा प्रसूतीनंतर कामावर परत येईल त्या प्रत्येक स्त्रीला तिचे मूल पंधरा महिन्यांचे होईपर्यंत आपल्या मुलाला पाजण्यासाठी तिच्या रोजच्या कामाच्या वेळात तिला मिळणाऱ्या विश्रांतीच्या मध्यंतराशिवाय विहित अवधीच्या आणखी दोन सुटचा देण्यात येतील. मुलांना पाजण्यासाठी कामाच्या वेळातील सुटचा.

१२. (१) जेव्हा एखादी स्त्री या अधिनियमाच्या उपबंधांनुसार कामावर अनुपस्थित राहीला तेव्हा, नियोक्त्याने अशा अनुपस्थितीच्या काळात किंवा त्या कारणावरून तिला कार्यमुक्त करणे किंवा कामावरून काढून टाकणे अथवा तिला कार्यमुक्तीची किंवा कामावरून काढून टाकण्याची नोटीस अशा दिवशी देणे की, जेणेकरून अशा अनुपस्थितीच्या काळातच ती नोटीस संपणारी असेल अथवा तिला नुकसानकारक अशाप्रकारे तिच्या सेवाशर्तींपैकी कोणत्याही शर्तीमध्ये बदल करणे हे बेकायदेशीर असेल. गरोदरपणा-निमित्त अनुपस्थित असण्याच्या काळात कामावरून काढून टाकणे.

(२) (क) एखाद्या स्त्रीला तिच्या गरोदरपणी कार्यमुक्त केले असेल किंवा कामावरून काढून टाकले असेल त्या बाबतीत, जर तिला याप्रमाणे कार्यमुक्त केले नसते किंवा कामावरून काढून टाकले नसते तर तो प्रसूतिविषयक लाभ व कलम ८ मध्ये निर्देशिलेला वैद्यकीय बोनस मिळण्यास हक्कदार झाली असती असे असल्यास, त्या स्त्रीला कार्यमुक्त केल्यामुळे किंवा कामावरून काढून टाकल्यामुळे परिणामी ती प्रसूतिविषयक लाभ किंवा वैद्यकीय बोनस मिळण्यापासून वंचित होणार नाही :

परंतु, विहित केल्याप्रमाणे कोणत्याही धडधडीत गैरवर्तणुकीबद्दल तिला कामावरून काढून टाकले असेल तेव्हा, नियोक्ता लेखी आदेशाद्वारे त्या स्त्रीला तसे कळवून तिला प्रसूतिविषयक लाभ किंवा वैद्यकीय बोनस किंवा दोन्ही मिळण्यापासून वंचित करू शकेल.

[2][(ख) प्रसूतिविषयक लाभ किंवा वैद्यकीय बोनस किंवा दोन्ही मिळण्यापासून वंचित झालेल्या अथवा या अधिनियमाच्या उपबंधांनुसार कामावर अनुपस्थित असेल त्या कालावधीत किंवा त्या कारणामुळे कार्यमुक्त करण्यात आलेल्या किंवा कामावरून काढून टाकलेल्या कोणत्याही स्त्रीला, याप्रमाणे वंचित करणारा किंवा कार्यमुक्त करणारा वा कामावरून काढून टाकणारा आदेश तिला कळविण्यात आल्याच्या दिनांकापासून साठ दिवसांच्या आत, विहित असेल अशा प्राधिकरणाकडे अपील करता येईल, आणि त्या स्त्रीला प्रसूतिविषयक लाभ किंवा वैद्यकीय बोनस किंवा दोन्ही मिळण्यापासून वंचित करावे की करू नये अथवा कार्यमुक्त करावे की करू नये वा कामावरून काढून टाकावे की टाकू नये याबाबत त्या प्राधिकरणाने अपिलान्ती दिलेला निर्णय अंतिम असेल.]

(ग) या पोटकलमात अंतर्भूत असलेल्या कोणत्याही गोष्टीमुळे पोटकलम (१) मध्ये अंतर्भूत असलेल्या उपबंधांना बाध येणार नाही.

---

१. १९८८ चा अधिनियम ६१, कलम ६ द्वारे "पंचवीस रुपये" याऐवजी घातले (१० जानेवारी १९८९ रोजी व तेव्हापासून).

२. १९८८ चा अधिनियम, ६१, कलम ७ द्वारे मूळ मजकुराऐवजी घातले. (१० जानेवारी १९८९ रोजी व तेव्हापासून).

विवक्षित प्रकरणी वेतनात कोणतीही कपात करावयाची नाही. १३. या अधिनियमाच्या उपबंधांखाली प्रसूतिविषयक लाभाला हक्कदार असणाऱ्या स्त्रीच्या नेहमीच्या ठराविक दैनिक वेतनामध्ये—

(क) कलम ४, पोटकलम (३) मध्ये अंतर्भूत असलेल्या उपबंधांच्या आधारे तिला नेमून दिलेल्या कामाचे स्वरूप, किंवा

(ख) कलम ११ च्या उपबंधांखाली मुलाला पाजण्यासाठी तिला कामामधून मिळणाऱ्या सुट्या, एवढ्याच कारणास्तव कोणतीही कपात केली जाणार नाही.

निरीक्षकांची नियुक्ती. १४. समुचित शासनाला शासकीय राजपत्रातील अधिसूचनेद्वारे या अधिनियमाच्या प्रयोजनार्थ निरीक्षक म्हणून योग्य वाटतील असे अधिकारी नियुक्त करता येतील व त्यांना या अधिनियमाखालील आपले कार्याधिकार जेथे वापरावे लागतील त्या अधिकारितेच्या स्थानिक सीमा निश्चित करता येतील.

निरीक्षकांच्या शक्ती व कर्तव्ये. १५. विहित करण्यात येतील अशा निर्बंधांच्या किंवा शर्तींच्या अधीनतेने, निरीक्षकाला पुढील सर्व किंवा त्यांपैकी कोणत्याही शक्ती वापरता येतील, त्या अशा—

(क) शासनाच्या किंवा कोणत्याही स्थानिक किंवा अन्य लोक प्राधिकरणाच्या सेवेत असलेल्यांपैकी त्याला योग्य वाटतील अशा काही व्यक्ती असल्यास, सहायक म्हणून त्यांना बरोबर घेऊन एखाद्या आस्थापनेमध्ये जेथे स्त्रियांना कामावर लावलेले असेल किंवा काम दिले जात असेल अशा कोणत्याही वास्तुमध्ये किंवा अशा जागी, या अधिनियमाखाली किंवा त्याद्वारे ठेवणे किंवा प्रदर्शित करणे आवश्यक असलेल्या कोणत्याही नोंदवह्या, अभिलेख व नोटिसा यांची तपासणी करण्यासाठी कोणत्याही वाजवी वेळी प्रवेश करणे आणि ते निरीक्षणासाठी सादर करण्यास फर्मावणे.

(ख) जी व्यक्ती कोणत्याही वास्तुमध्ये किंवा त्या जागी त्याला आढळेल आणि जी त्या आस्थापनेमध्ये कामाला आहे असे समजण्यास त्याला वाजवी कारण असेल अशा कोणत्याही व्यक्तीची तपासणी करणे :

परंतु, कोणत्याही व्यक्तीला गुन्ह्यात गोवण्याकडे कल असलेल्या कोणत्याही प्रश्नाचे उत्तर देण्याबाबत किंवा कोणताही पुरावा देण्याबाबत या कलमाखाली तिच्यावर सक्ती केली जाणार नाही ;

(ग) या अधिनियमाखाली कामावर लावलेल्या स्त्रियांची नावे व पत्ते, त्यांना देण्यात येणाऱ्या रकमा व त्यांच्याकडून येणारे अर्ज किंवा नोटिसा यांबाबतची माहिती देण्यास नियोक्त्याला फर्मावणे ; आणि

(घ) कोणत्याही नोंदवह्या व अभिलेख किंवा नोटिसा किंवा त्यांचे कोणतेही भाग यांच्या नकला घेणे.

निरीक्षक हे लोकसेवक असणे. १६. या अधिनियमाखाली नियुक्त केलेला प्रत्येक निरीक्षक हा 'भारतीय दंड संहिता' (१८६० चा ४५) कलम २१ च्या अर्थानुसार लोकसेवक असल्याचे मानण्यात येईल.

रकमा देण्याबाबत निदेश देण्याची निरीक्षकाची शक्ती. १७. [1][(१) (क) या अधिनियमाखालील प्रसूतिविषयक लाभाला किंवा अन्य कोणत्याही रकमेला हक्कदार असणाऱ्या कोणत्याही स्त्रीला आणि कलम ७२ खालील प्रदेय असणारी रक्कम अयोग्य रीत्या रोखून ठेवण्यात आल्याचा दावा करणाऱ्या कोणत्याही व्यक्तीला.

(ख) या अधिनियमाच्या उपबंधानुसार जिच्या नियोक्त्याने तिला तिच्या अनुपस्थितीत किंवा अनुपस्थितीच्या कारणावरून कामावरून काढून टाकले किंवा बडतर्फ केले असेल अशा कोणत्याही स्त्रीला, निरीक्षकाकडे तक्रार करता येईल.

(२) निरीक्षक स्वत: होऊन किंवा पोटकलम (१) मध्ये निर्देशिलेली तक्रार मिळाल्यावर चौकशी करता येईल किंवा चौकशी करवता येईल.

(क) प्रदान गैरपणे रोखून ठेवले आहे, अशी खात्री झाली तर, त्याच्या आदेशानुसार प्रदान करण्यात यावे, असे निदेश देता येतील ;

(ख) या अधिनियमाच्या उपबंधांनुसार तिच्या अनुपस्थितीत किंवा अनुपस्थितीच्या कारणावरून तिला कामावरून काढून टाकले आहे किंवा बडतर्फ केले आहे अशी खात्री झाली तर प्रकरणाच्या परिस्थितीनुसार न्याय्य व उचित असतील असे आदेश देता येतील.]

(३) पोटकलम (२) खालील निरीक्षकाच्या निर्णयामुळे नाराज झालेल्या कोणत्याही व्यक्तीला, असा निर्णय अशा व्यक्तीला कळवला गेला त्या दिनांकापासून तीस दिवसांच्या आत विहित प्राधिकरणाकडे अपील करता येईल.

---

१. १९८८ चा अधिनियम ६१, कलम ८ द्वारे मूळ मजकुराऐवजी घातले (१० जानेवारी १९८९ रोजी व तेव्हापासून).

(४) पोटकलम (३) खाली ज्या विहित प्राधिकरणाकडे अपील दाखल केलेले असेल त्याचा किंवा जेव्हा असे कोणतेही अपील दाखल केलेले नसेल तेव्हा निरीक्षकाचा निर्णय अंतिम असेल.

[1][(५) या कलमाखाली प्रदेय असलेली कोणतीही रक्कम त्या रकमेबाबत निरीक्षकाने दिलेल्या प्रमाणपत्रावरून जिल्हाधिकाऱ्याकडून जमीन महसूलाच्या थकबाकीप्रमाणे वसूल करता येण्यासारखी असेल.]

१८. एखादया स्त्रीला कलम ६ च्या उपबंधांखाली अनुपस्थित राहण्यास तिच्या नियोक्त्याने परवानगी दिल्यानंतर अशा अधिकृत अनुपस्थितीच्या कोणत्याही कालावधीमध्ये तिने कोणत्याही आस्थापने-मध्ये काम केले तर, ती अशा कालावधीसंबंधीच्या प्रसूतिविषयक लाभावरील हक्क गमावील. प्रसूतिविषयक लाभ गमावणे.

१९. ज्या आस्थापनेमध्ये स्त्रियांना कामावर लावलेले आहे तिच्या प्रत्येक भागामध्ये नियोक्त्याला स्थानिक भाषेमध्ये किंवा भाषांमध्ये या अधिनियमाचे उपबंध व त्यांखाली केलेले नियम यांचा गोषवारा ठळक जागी प्रदर्शित करावा लागेल. अधिनियम आणि त्याखाली केलेले नियम यांचा गोषवारा प्रदर्शित करणे.

२०. प्रत्येक नियोक्त्याला विहीत करण्यात येईल त्याप्रमाणे तशा नोंदवह्या, अभिलेख व हजेरीपट तशा विहीत रीतीने करून ते राखावे लागतील. नोंदवह्या इत्यादी.

[2][२१. (१) कोणत्याही नियोक्त्याने, या अधिनियमान्वये हक्कदार असलेल्या स्त्रीला कोणतीही प्रसूतिविषयक लाभाची रक्कम देण्यात कसूर केली तर, किंवा या अधिनियमाच्या उपबंधान्वये अशा स्त्रीला तिच्या अनुपस्थितीच्या कालावधीत किंवा त्या कारणावरून कामावरून काढून टाकले किंवा बडतर्फ केले तर, तो तीन महिन्यांपेक्षा कमी नाही परंतु, एक वर्षापर्यंत असू शकेल इतक्या मुदतीच्या कारावा-साच्या शिक्षेस आणि दोन हजार रुपयांपेक्षा कमी नाही परंतु, पाच हजार रुपयांपर्यंत असू शकेल अशा द्रव्यदंडाच्या शिक्षेस पात्र असेल : [2][नियोक्त्याने व्यतिक्रमण केल्याबद्दल शास्ती.]

परंतु, न्यायालयाला, लेखी अभिलिखित करावयाच्या पुरेशा कारणांवरून फक्त कारावासाऐवजी, त्यापेक्षा कमी मुदतीच्या कारावासाचा किंवा द्रव्यदंडाचा शिक्षादेश देता येईल.

(२) कोणत्याही नियोक्त्याने या अधिनियमाच्या उपबंधाचे किंवा त्याखाली करण्यात आलेल्या नियमांचे व्यतिक्रमण केल्यास, अशा व्यतिक्रमणाबद्दल या अधिनियमाद्वारे वा अन्वये अन्यत्र अन्य कोण-तीही शास्ती उपबंधित करण्यात आली नसेल तर, तो, एक वर्षापर्यंत असू शकेल इतक्या कारावासाच्या किंवा पाच हजार रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या द्रव्यदंडाच्या किंवा दोन्ही शिक्षांस पात्र असेल ;

परंतु, हे व्यतिक्रमण प्रसूतिविषयक लाभाच्या किंवा अन्य कोणत्याही रकमेच्या प्रदानासंबंधातील कोणत्याही उपबंधाचे असेल आणि असा प्रसूतिविषयक लाभ किंवा रक्कम यापूर्वीच वसूल करण्यात आलेली नसेल तर, न्यायालय असा प्रसूतिविषयक लाभ किंवा रक्कम ही जणू काही द्रव्यदंडच असल्याप्रमाणे वसूल करील आणि ती त्यास हक्कदार असलेल्या व्यक्तीला प्रदान करील.]

२२. जो कोणी या अधिनियमाला अनुसरून ठेवलेली आपल्या ताब्यातील कोणतीही नोंदवही अथवा दस्तऐवज निरीक्षकाने मागणी केली असता हजर करण्यास चुकेल अथवा एखाद्या व्यक्तीने निरी-क्षकापुढे उपस्थित होऊ नये किंवा त्याच्याकडून तिची तपासणी केली जाऊ नये म्हणून तिच्याबाबत गुप्तता राखील किंवा त्या गोष्टीस प्रतिबंध करील, तो [3][एक वर्षापर्यंत असू शकेल इतक्या मुदतीच्या कारावासाच्या शिक्षेस किंवा पाच हजार रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या द्रव्यदंडास किंवा दोन्ही शिक्षांस पात्र असेल.] निरीक्षकाला अटकाव करण्याबाबत शास्ती.

[4][२३. (१) कोणत्याही व्यथित स्त्रीला व्यवसाय संघ अधिनियम, १९२६ (१९२६ चा १६) या खालील नोंदणीकृत कोणत्याही अशा ज्या श्रमिक संघाची अशी स्त्री सदस्य आहे, त्या व्यवसाय संघाच्या कोणत्याही पदाधिकाऱ्याला किंवा सोसायटी नोंदणी अधिनियम, १८६० (१८६० चा २१) या खालील नोंदणीकृत कोणत्याही स्वेच्छा संघटनेला किंवा कोणत्याही निरीक्षकाला, या अधिनियमा-खालील केलेल्या कोणत्याही अपराधासंबंधात सक्षम अधिकारिता असलेल्या कोणत्याही न्यायालयात फिर्याद दाखल करता येईल आणि अशी कोणतीही फिर्याद अपराध ज्या तारखेस घडल्याचे अभिकथित करण्यात आले असेल, त्या तारखेपासून एका वर्षाच्या समाप्तीनंतर दाखल करण्यात येणार नाही. [4][अपराधांची दखल.]

(२) महानगर दंडाधिकाऱ्याच्या किंवा प्रथम वर्ग दंडाधिकाऱ्याच्या न्यायालयापेक्षा कनिष्ठ असे कोणतेही न्यायालय या अधिनियमान्वये कोणत्याही अपराधाची संपरीक्षा करणार नाही.]

---

१. १९८८ चा अधिनियम ६१, कलम ७ द्वारे मूळ मजकुराऐवजी घातले (१० जानेवारी १९८९ रोजी व तेव्हापासून).

२. १९८८ चा अधिनियम ६१, कलम ९ द्वारे मूळ कलमाऐवजी दाखल केले (१० जानेवारी १९८९ रोजी व तेव्हापासून).

३. १९८८ चा अधिनियम ६१, कलम १० द्वारे मूळ मजकुराऐवजी घातले (१० जानेवारी १९८९ रोजी व तेव्हापासून).

४. वरील अधिनियमाच्या कलम ११ द्वारे समाविष्ट केले (९ जानेवारी १९८९ रोजी व तेव्हापासून).

सद्भावपूर्वक केलेल्या कारवाईस संरक्षण. २४. या अधिनियमास अथवा त्याखाली काढलेला कोणताही नियम किंवा आदेश यांस अनुसरून जी गोष्ट सद्भावपूर्वक केलेली किंवा करण्याचे योजलेली असेल अशा कोणत्याही गोष्टीबद्दल कोणत्याही व्यक्तिविरुद्ध कोणताही दावा, खटला किंवा अन्य वैध कार्यवाही होऊ शकणार नाही.

निदेश देण्याची केंद्र शासनाची शक्ती. २५. केंद्र शासन या अधिनियमांच्या उपबंधांच्या अंमलबजावणीबाबत त्याला आवश्यक वाटतील असे निदेश राज्य शासनाला देऊ शकेल आणि राज्य शासन अशा निदेशांचे पालन करील.

आस्थापनांना सूट देण्याची शक्ती. २६. या अधिनियमात उपबंधित केलेल्या लाभांहून कमी अनुकूल नाहीत असे लाभ प्रदान करण्याची तरतूद करणारी एखादी आस्थापना किंवा आस्थापनावर्ग लक्षात घेता तसे करणे आवश्यक आहे अशी जर समुचित शासनाची खात्री झाली तर, **शासकीय राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे ते, अधिसूचनेमध्ये विनिर्दिष्ट करण्यात येतील अशा काही शर्ती व निर्बंध असल्यास त्यांच्या अधीनतेने, अशा आस्थापनेला किंवा आस्थापनावर्गाला या अधिनियमाचे सर्व किंवा त्यापैकी कोणतेही उपबंध किंवा त्याखाली केलेला कोणताही नियम लागू होण्यापासून सूट देऊ शकेल.

या अधिनियमाशी विसंगत असे कायदे व करार यांची परिणामकता. २७. (१) अन्य कोणत्याही कायद्यात अथवा कोणताही लवाद निवाडा, करार वा सेवा-संविदा यांच्या अटींमध्ये मग ते या अधिनियमाच्या प्रारंभापूर्वी केलेले असोत वा नंतर केलेले असोत या अधिनियमाच्या उपबंधाशी विसंगत असे काहीही अंतर्भूत असले तरी, हे उपबंध परिणामक होतील :

परंतु, जेव्हा अशा कोणत्याही बाबीसंबंधी एखाद्या स्त्रीला या अधिनियमाखाली ज्या लाभांवर हक्क प्राप्त झाला असता त्याहून जे तिला अधिक अनुकूल आहेत अशा लाभांना ती असा कोणताही लवाद निवाडा, करार किंवा सेवा-संविदा याखाली किंवा अथवा हक्कदार असेल तर, इतर बाबतीत तिला या अधिनियमाखाली लाभ मिळत असले तरी, तेवढ्या बाबीपुरती ती अधिक अनुकूल लाभ मिळण्यास हक्कदार असण्याचे चालू राहील.

(२) एखादी स्त्री एखाद्या बाबतीत या अधिनियमाखाली जे अधिकार किंवा सवलती मिळण्यास हक्कदार होऊ शकेल त्यापेक्षा जे तिला अधिक अनुकूल आहेत असे अधिकार किंवा सवलती आपणास देण्याविषयी आपल्या नियोक्त्याशी करार करण्यास त्या स्त्रीला या अधिनियमातील कोणतीही गोष्ट प्रतिबंधक आहे असा तिचा अर्थ लावला जाणार नाही.

नियम करण्याची शक्ती. २८. (१) या अधिनियमाची प्रयोजने पार पाडण्यासाठी समुचित शासनाला पूर्वप्रकाशनांच्या शर्तीच्या अधीनतेने व **शासकीय राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे नियम करता येईल.

(२) विशेषत: आणि पूर्वगामी शक्तीच्या व्यापकतेला बाध न येता अशा नियमांमध्ये पुढील गोष्टींबाबत उपबंध करता येतील :—

(क) नोंदवह्या, अभिलेख व हजेरीपट तयार करून ते राखणे;

(ख) या अधिनियमाच्या प्रयोजनार्थ निरीक्षकांनी शक्तींचा वापर करणे (आस्थापनांचे निरीक्षण धरून) व कर्तव्यांचे पालन करणे;

(ग) या अधिनियमाखालील प्रसूतिविषयक लाभ व अन्य लाभ देण्याबाबत या अधिनियमामध्ये उपबंध केलेला नसेल तर ते देण्याच्या पद्धतीविषयी तेवढ्या मर्यादेपर्यंत;

(घ) कलम ६ खालील नोटिशींचा नमुना;

(ङ) या अधिनियमाच्या उपबंधांखाली आवश्यक असलेल्या पुराव्याचे स्वरूप;

(च) कलम ११ मध्ये निर्देशिल्याप्रमाणे, मुलांना पाजण्यासाठी कामाच्या वेळात ज्या सुट्या द्यावयाच्या त्यांचा अवधी;

(छ) कलम १२ च्या प्रयोजनार्थ धडधडीत गैरवर्तणूक ठरतील अशी कृत्ये;

(ज) कलम १२, पोटकलम (२) खंड (ख) खाली कोणत्या प्राधिकरणाकडे अपील होऊ शकेल; कोणत्या नमुन्यात व कोणत्या रीतीने असे अपील करता येईल व त्याचा निकाल देण्यासाठी अनुसरावयाची कार्यपद्धती;

(ञ) कलम १७ पोटकलम (१) खाली निरीक्षकांकडे कोणत्या नमुन्यात व कोणत्या रीतीने तक्रारी करता येतील आणि ह्या कलमाच्या पोटकलम (२) खाली चौकशी करण्यासाठी किंवा चौकशी करवण्यासाठी त्यांनी अनुसरावयाची कार्यपद्धती;

(ट) विहित करावयाची किंवा करता येईल अशी अन्य कोणतीही बाब.

(३) या कलमाखाली केंद्र शासनाने केलेला प्रत्येक नियम, तो करण्यात आल्यानंतर होईल तितक्या लवकर संसदेच्या प्रत्येक सभागृहासमोर, ते एका सत्राने [1][अथवा दोन किंवा अधिक क्रमवर्ती सत्रे मिळून] बनलेल्या अशा एकूण तीस दिवसांच्या कालावधीकरिता सत्रासीन असताना ठेवला जाईल, [1][आणि पूर्वोक्त सत्राच्या किंवा क्रमवर्ती सत्रांच्या पाठोपाठचे सत्र संपण्यापूर्वी जर,] त्या नियमात कोणतेही आपरिवर्तन करण्याबाबत दोन्ही सभागृहांचे मतैक्य झाले अथवा तो नियम करण्यात येऊ नये याबाबत दोन्ही सभागृहांचे मतैक्य झाले तर, त्यानंतर तो नियम अशा आपरिवर्तित रूपातच परिणामक होईल किंवा, प्रकरणपरत्वे, मुळीच परिणामक होणार नाही; तथापि अशा कोणत्याही आपरिवर्तनामुळे किंवा शून्यीकरणामुळे, तत्पूर्वी त्या नियमाखाली करण्यात आलेल्या कोणत्याही गोष्टीच्या विधिग्राह्यतेला बाध येणार नाही.

२९. 'मळे कामगार अधिनियम, १९५१' याच्या कलम ३२ मध्ये,—

(क) पोटकलम (१) मध्ये "अर्हताप्राप्त वैद्यक व्यवसायीने प्रमाणित केलेल्या आजाराच्या बाबतीत" या शब्दापूर्वीचे अक्षर व कंस "(क्)", "रुग्णता भत्ता" या शब्दानंतरचा "आणि" हा शब्द आणि खंड (ख्) गाळण्यात येईल; १९५१ चा अधिनियम ६९ याचे विशोधन.

(ख) पोटकलम (३) मध्ये "किंवा प्रसूती" हे शब्द गाळण्यात येतील.

३०. हा अधिनियम—

(एक) खाणींना लागू झाल्यावर 'खाणी प्रसूतिविषयक लाभ अधिनियम, १९४१' (१९४१ चा १९); निरसन. आणि

(दोन) दिल्ली या संघ राज्यक्षेत्रामध्ये असणाऱ्या कारखान्यांना लागू झाल्यावर 'मुंबई प्रसूतिविषयक लाभ अधिनियम, १९२९' (१९२९ चा मुंबई अधिनियम सात) त्या राज्यक्षेत्रात जसा अंमलात असेल तसा तो अधिनियम हे निरसित ठरतील.

---

१. १९७३ चा अधिनियम ५२, कलम ५ द्वारे विवक्षित मजकुराऐवजी हा मजकूर घातला (१ मार्च १९७५ रोजी व तेव्हापासून).

## THE MATERNITY BENEFIT ACT, 1961
## प्रसूतिविषयक लाभ अधिनियम, १९६१
### इंग्रजी–मराठी शब्दसूची

| | | |
|---|---|---|
| acrobatic performances | नाडेभोरप्याचा खेळ | [ S. 1 (3) (a) ] |
| arduous | काबाडकष्टाचे | [ S. 4 (3) ] |
| chief executive officer | प्रमुख कार्यकारी अधिकारी | [ S. 3 (d) (ii) ] |
| conceal | गुप्तता राखणे | [ S. 22 ] |
| discharge | कार्यमुक्त करणे | [ S. 12 (1) ] |
| dismissal | कामावरून काढून टाकणे | [ S. 12 (1) ] |
| equestrian performance | घोडेस्वारीचा खेळ | [ S. 1 (3) (a) ] |
| gross misconduct | धडधडीत गैरवर्तणूक | [ S. 12 (2) (a)-proviso ] |
| incentive bonus | प्रोत्साहन बोनस | [ S. 3 (n) (2) ] |
| lay off | अपरिहार्य कामबंदी लागू करणे | [ S. 5 (2)-expl. ] |
| maternity benefit | प्रसूतिविषयक लाभ | [ S. 3 (h) ] |
| miscarriage | गर्भपात | [ S. 3 (j)] |
| normal and usual wages | नेहमीचे ठराविक वेतन | [ S. 13 ] |
| post-natal care | प्रसूतिनंतरची देखभाल | [ S. 8 ] |
| pregnant uterus | गर्भधारणा झालेला गर्भाशय | [ S. 3 (j) ] |
| pre-natal confinement | प्रसूतीपूर्वी प्रसूतिगृहात दाखल होणे | [ S. 8 ] |

---

## प्रसूतिविषयक लाभ अधिनियम, १९६१
## THE MATERNITY BENEFIT ACT, 1961
### मराठी–इंग्रजी शब्दसूची

| | | |
|---|---|---|
| अपरिहार्य कामबंदी लागू करणे | lay off | [क. ५ (२) स्पष्टी] |
| काबाड कष्टाचे | arduous | [क. ४ (३) ] |
| कामावरून काढून टाकणे | dismissal | [क. १२(१) ] |
| कार्यमुक्त करणे | discharge | [क. १२(१) ] |
| गर्भधारणा झालेला गर्भाशय | pregnant uterus | [क. (३) (ब्) ] |
| गर्भपात | miscarriage | [क. (३) (ब्) ] |
| गुप्तता राखणे | conceal | [क. २२] |
| घोडेस्वारीचा खेळ | equestrian performance | [क. १ (३) (क्) ] |
| धडधडीत गैरवर्तणूक | gross misconduct | [क. १२ (२) (क्) (परंतुक) ] |
| नाडेभोरप्याचा खेळ | acrobatic performance | [क. १ (३) (क्) ] |
| नेहमीचे ठराविक वेतन | normal and usual wages | [क. १३] |
| प्रमुख कार्यकारी अधिकारी | chief executive officer | [क. ३ (घ्) (दोन) ] |
| प्रसूतिविषयक लाभ | maternity benefits | [क. ३ (ज्) ] |
| प्रसूतिनंतरची देखभाल | post-natal care | [क. ८] |
| प्रसूतीपूर्वी प्रसूतिगृहात दाखल होणे | pre-natal confinement | [क. ८] |
| प्रोत्साहन बोनस | incentive bonus | [क. ३ (ढ) (२) ] |

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई